॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/१५४

दिनांक : २२/१०/२०२६

प्रति,

परिपत्रक

मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये, व
**विद्यापीठ परिसर,** प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करणे व राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत 'नशामुक्त मित्र' उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ :डॉ.सुनील भोकरे,आयुक्त,शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक,म.रा.एड्स नियंत्रण संस्था,मुंबई याचे जाक्र.मराएनिसं/मशिसं/आआरसी/नशामुक्त भारत अभियान/२०२६–२७/७०६४ दि.३०.०९.२०२६

महोदय/महोदया

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थाए मुंबई यांच्या निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना कार्यरत असलेल्या सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करणे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'नशामुक्त मित्र' उपक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. राष्ट्रीय सेवा योजना युनिटने महाविद्यालयात रेड रिबन क्लब स्थापन करून 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबवावेत.

२. राष्ट्रीय सेवा योजना युनिटमधून इच्छुक व सक्रिय स्वयंसेवकांची 'नशामुक्त मित्र' म्हणून नियुक्ती करावी व त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे.

३. नियुक्त 'नशामुक्त मित्र' यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांमध्ये अमली पदार्थांचे सेवन टाळणे, व्यसनमुक्ती, एचआयव्हीध्एड्स प्रतिबंध व आरोग्यविषयक जनजागृती करण्यात यावी.

४. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांतर्गत विशेष शिबिरे, ग्रामभेटी, युवक संवाद, जनजागृती रॅली, व्याख्याने, पोस्टरधनिबंध स्पर्धा व प्रतिज्ञा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करावे.

५. सदर उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित प्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांनी आवश्यक नियोजन करून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांनी वरील निर्देशांनुसार रेड रिबन क्लब स्थापन करून 'नशामुक्त मित्र' उपक्रम प्रभावीपणे राबवून आयोजित उपक्रमांचा अहवाल, छायाचित्रे व आवश्यक माहिती संकलित करून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या nss@srtmun.ac.in तसेच महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या iec_msacs@mahasacs.org_इमेलवर सादर करण्यात यावा

डॉ.मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

१०९. 127

MSACS

**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था**
(महाराष्ट्र शासन)
आर.ए.किडवाई मार्ग, अॅकवर्थ लेप्रसी कॉम्पलेक्स,
वडाळा(प.) मुंबई-४०००३१

जा.क्र.मराएनिसं/माशिसं/आरआरसी/ नशामुक्त भारत अभियान /२६-२७ /7064
दिनांक-30 /09 /२०२६

प्रति.

राज्य संपर्क अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस),
महाराष्ट्र राज्य.

विषय : राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब (RRC) स्थापन करून नशामुक्त भारत अभियान (Nasha Mukt Bharat Abhiyaan- NMBA) अंतर्गत "नशामुक्त मित्र" (Nasha Mukt Mitra) नियुक्त करण्याबाबत..

संदर्भ : राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना (NACO), आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजीचे पत्र.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, जनजागृती तसेच युवकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी युवकांचा सक्रिय सहभाग महत्त्वपूर्ण आहे.
या अनुषंगाने युवक व किशोरवयीन गटांचा म्हणून सक्रिय सहभाग घेऊन अमली पदार्थांच्या वापरास प्रतिबंध, व्यसनमुक्ती, आरोग्यविषयक जनजागृती तसेच आवश्यक शासकीय सेवा व सुविधांबाबत माहिती समाजापर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. मार्फत राज्यातील रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस) नेटवर्कच्या माध्यमातून युवकांची "नशा मुक्त मित्र" म्हणून नियुक्ती करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत राज्यातील विविध महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी स्वयंसेवक कार्यरत असून, हे स्वयंसेवक सामाजिक जनजागृती, समुदाय सहभाग आणि विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात.

त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना चे व्यापक नेटवर्क आणि रेड रिबन क्लब यांचा समन्वय साधून युवकांना "नशामुक्त मित्र" म्हणून सहभागी करून घेणे हा या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरेल.

त्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून राज्यातील संबंधित विद्यापीठे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांना खालीलप्रमाणे आवश्यक निर्देश देण्यात यावेत :

१. राज्यातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करण्यात यावा. ज्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब आधीच कार्यरत आहे, ते रेड रिबन क्लब मार्फत नियमित जनजागृती उपक्रम राबविण्यात यावेत.

MSACS
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
(महाराष्ट्र शासन)
आर.ए.किडवाई मार्ग, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्पलेक्स,
वडाळा(प.) मुंबई-४०००३१

२. प्रत्येक राष्ट्रीय सेवा योजना युनिटने आपल्या महाविद्यालयातील रेड रिबन क्लब सोबत समन्वय साधून "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत उपक्रम राबवावेत.

३. प्रत्येक संबंधित राष्ट्रीय सेवा योजना युनिटमधून इच्छुक व सक्रिय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची "नशामुक्त मित्र म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

४. नियुक्त "नशामुक्त मित्र" यांना कार्य करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे.

५. रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व युवकांमध्ये अमली पदार्थांचे सेवन टाळणे, व्यसनमुक्ती, एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, आरोग्यविषयक जनजागृती करण्यात यावी.

६. राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रम, विशेष शिबिरे, ग्रामभेटी, युवक संवाद, जनजागृती रॅली, व्याख्याने, पोस्टर/निबंध स्पर्धा, प्रतिज्ञा इत्यादी उपक्रमांमध्ये "नशा मुक्त भारत अभियान" व एचआयव्ही/एड्स प्रतिबंध विषयांचा समावेश करण्यात यावा.

७. रेड रिबन क्लब व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त माध्यमातून उपक्रम राबवून युवकांमध्ये अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करण्यात यावी.

८. विद्यापीठनिहाय व महाविद्यालयनिहाय रेड रिबन क्लब स्थापनेची स्थिती तसेच "नशामुक्त मित्र" म्हणून नियुक्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची माहिती संकलित करण्यात यावी.

९. राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा अनुपालन अहवाल आवश्यक माहितीसह महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेस icc_msacs@mahasacs.org हया ईमेल आयडीवर उपलब्ध करून देण्यात यावा.

त्याअनुषंगाने राज्यातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करून, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून "नशामुक्त मित्र" उपक्रम राबविण्यासाठी आपल्या स्तरावरून सर्व संबंधित विद्यापीठे व महाविद्यालयांना आवश्यक निर्देश निर्गमित करण्यात यावेत, ही विनंती.

सदर उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, समन्वय व सहकार्य करण्यास तयार आहे.

डॉ.सुनील भोकरे, भा.प्र.से
आयुक्त, शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई

प्रत माहितीस्तव :

१. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, रासेयो क्षेत्रिय संचलनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे
२. कार्यक्रम समन्वयक तथा संचालक (रासेयो), सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य